http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email:beedvatsav@gmail.com ●किंमत ३ रुपये

स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तवची २० वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ईपेपर वाचा
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# सरकारच्या सर्व षडयंत्राच्या ठिकऱ्या उडवीण्यासाठी सोनम वांगचूक यांच्या बाजूने देशातील तरूण एकवटला!!

देशात ज्या छोट्या मोठ्या लोक चळवळी सुरू असून त्यांनी एकत्र येत सोनम वांगचूक यांना पाठिंबा दिलाच पाहिजे!!

लोकचळवळी संपवणे, पत्रकारांचा आवाज बंद करणे हे देशाला आणि देशातील लोकशाहीला परवडणारे नाही!

सीआरपीएफ कर्मचाऱ्यांनी केला पत्रकारांचा पाठलाग; परिस्थिती अधिकाधिक दमनकारी होत चालली!!

## अजूनही अटकेच्या आदेशाची प्रत मिळाली नाही; सोनम वांगचुक यांच्या पत्नीचा दावा



**बीड : सोनम वांगचूक पाकिस्तानच्या हस्तक आहेत या कहाणीवर देशात अजून तरी कोणी विश्वास ठेवायला तयार नाही. कधी देशद्रोही, कधी नक्षलवादी तर कधी खलिस्तानवादी असल्याचा स्टॅम्प मारून चळवळीतील कार्यकर्त्यांना हैराण केलं जातंय. वर्षानुवर्षे तुरूंगात डांबलं जातंय. शेकडो उदाहरणं देता येतील याची! असं का होत असावं? कारण सरकार चळवळींना घाबरतंय. राजकीय विरोधकांची सरकारला भिती नसते. त्यांचा आवाज बंद करण्याच्या अनेक क्लुप्त्या आणि युक्त्या सरकारकडं असतात. कधी सीबीआयची, कधी इडीची तर कधी तुरूंगाची भिती दाखवून राजकीय नेत्यांचा आवाज बंद केला जातो. भिती दाखवायची अन त्यांना पक्षात घ्यायचं..! पवित्र करून घ्यायचं..! म्हणजे विरोधक ठेवायचाच नाही असं हे धोरण आहे. परंतु लडाखचे सामाजिक कार्यकर्ते असलेले सोनम वांगचुक यांना पाकिस्तानच्या हस्तक असल्याची जी कहाणी बनविण्यात आली यावर मात्र देश वासियांचा विश्वास नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे साहजिकच सोनम वांगचूक यांच्या बाजूने देशातील तरुण एकवटल्याचे दिसून येत आहे.**

### देशात सरकारला चळवळी नकोच!!

● चळवळींबद्दलही सरकारची अशीच भूमिका असतेकी देशात सरकारला चळवळी नकोच आहेत. अन् म्हणूनच त्या मोडून काढण्यासाठी सरकार कोणत्याही थराला जायला तयार असतं. एक काळ असा होता की, कामगारांच्या चळवळी, शेतकरयांच्या चळवळींकडे चक्का जाम करण्याची प्रसंगी देश बंद पाडण्याची ताकद होती. या सर्व चळवळी टप्प्या टप्प्याने बंद पाडल्या गेल्या. मध्यंतरी पंजाबच्या शेतकऱ्यांनी दिल्लीला वेढा दिला होता. अगोदर सरकारनं त्यांच्या आंदोलनाची उपेक्षा केली, त्याकडे दुर्लक्ष केलं. तरीही शेतकरी जागचे हालत नाहीत म्हटल्यावर सरकारनं आपलं बदनामीचं नेहमीचं अस्त्र बाहेर काढलं. आंदोलक शेतकरी खलिस्तानवादी असल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवला गेला. शेतकरी आंदोलनास जनतेची सहानुभूती मिळू नये असा या बदनामी मागचा हेतू होता. मात्र शेतकऱ्यांनी पर्वा केली नाही. अखेर सरकारला शरण येत शेतकरी विरोधी कायदे रद्द करावे लागले. भीमा-कोरेगाव प्रकरणात कार्यकर्त्यांना नक्षलवादी ठरवत असंच तुरूंगात डांबले गेले. अशी अनेक उदाहरणं देता येतील.

### अ.भा.मराठी पत्रकार परिषदेचे एस. एम. देशमुख काय म्हणाले



● सरकारला चळवळीचे धास्ती वाटण्याचे कारण असे की, कार्यकर्ते कश्यालाच घाबरत नाहीत. कारण गमविणयासारखं या कार्यकर्त्यांजवळ काहीच नसतं. इडी, सीबीआयची मात्रा त्यांच्यावर चालत नाही. त्यांना अटकेची भिती नसते. अन् ते सहसा मॅंनेजही होत नाहीत. सरकार त्यांच्यापुढे हताश होतं, हतबल होतं. सोनम वांगचूक यांच्या बाबतीत असंच होताना दिसत आहे. आपल्या काही मागण्यांसाठी वांगचुंक सनदशीर मार्गाने उपोषण करीत होते. आख्खा लडाख त्यांच्या पाठिशी होता. चळवळीशी चर्चा करून त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यात सरकारला नेहमीच कमीपणा वाटला. त्यामुळे अपेक्षेप्रमाणे सरकारनं वांगचूक यांच्या उपोषणाकडं दुर्लक्ष केले. हिंसाचार झाला. मग सोनम वांगचूक यांना अटक करून त्यांची स्वतंत्र राज्यासाठीची चळवळ मोडीत काढण्यासाठी सरकारला आयतंच कोलीत मिळालं. सोनम वांगचूक यांना झटपट अटक केली गेली. पुन्हा तेच ब्रह्मास्त्र वापरले गेले. सोनम वांगचूक हे पाकिस्तानचे हस्तक असल्याचं सांगून त्यांच्या सहानुभूतीदारांची संख्या कमी करण्याचा आणि त्यांची चळवळ मोडीत काढण्याचा प्रयत्न केला गेला. सुदैवानं वांगचूक हे पाकिस्तानचे हस्तक आहेत या कहाणीवर देशात अजून तरी कोणी विश्वास ठेवायला तयार नाही. हा बाण वाया गेल्यानं सरकार वांगचूक यांच्या बदनामी साठी नवं हत्यार बाहेर काढेल हे नक्की!

### लडाखमध्ये सोनम वांगचूक यांच्या नेतृत्वाखाली चळवळ मोडून काढायची!

● काहीही करून लडाखमधये सोनम वांगचूक यांच्या नेतृत्वाखाली उभी राहिलेली चळवळ केंद्राला मोडून काढायची आहे.

● लडाखला राज्याचा दर्जा दिला गेला तर अदानी यांचे हितसंबंध जोपासणे शक्य होणार नाहीत. त्यामुळे रासुका आणि देशद्रोहाच्या आरोपाखाली सोनम वांगचूक यांना वर्षानुवर्षे तुरूंगात सडवले जाईल. नेताच तुरूंगात आहे म्हटल्यावर लडाखमधील चळवळ दिशाहीन होईल. मग ती संपविणे सरकारला अधिक सोपे होईल. वरील सर्व वास्तव बघता, देशात ज्या छोट्या मोठ्या लोक चळवळी सुरू आहेत त्यांनी एकत्र येत सोनम वांगचूक यांना पाठिंबा दिला पाहिजे.

● आपल्याला काय त्याचे ही भूमिका घेऊन जनतेलाही चालणार नाही. लोकचळवळी संपणे, पत्रकारांचा आवाज बंद करणे हे देशाला आणि देशातील लोकशाहीला परवडणारे नाही.

● चळवळींच्या माध्यमातून जनतेचे असंख्य प्रश्न सुटलेले आहेत. त्याच संपल्या तर सत्ता अधिक उन्मत्त आणि निरंकुश होईल. सत्तेवर कोणाचा तरी अंकुश राहिला पाहिजे यासाठी तरी आपल्याला सोनम वांगचूक यांची पाठराखण करावीच लागेल, असेही अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी म्हंटले आहे.

### सोनम वांगचुक प्रकरणी देशातून तीव्र प्रतिक्रिया

● लडाख हिंसाचार प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या प्रकरणी देशातील प्रतिक्रिया येत आहेत. दरम्यान, आता त्यांची पत्नी गीतांजली वांगचुक यांनी नवीन दावा केला आहे. 'लेहमध्ये माध्यमांशी बोलण्याचा त्यांचा प्रयत्न रोखला जात असल्याने त्यांना देशासमोर त्यांची बाजू मांडण्यासाठी दिल्लीला यावे लागले', असा दावा त्यांनी केला. शुक्रवारी वांगचुक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्याअंतर्गत ताब्यात घेण्यात आले.

### लेहमध्ये कर्फ्यू आहे आणि इंटरनेट बंद

● लेहमध्ये कर्फ्यू आहे आणि इंटरनेट बंद आहे, "आम्ही काम करू शकत नाही किंवा माध्यमांशी बोलू शकत नाही. माध्यम कर्मचाऱ्यांना आमच्या संस्थेत, हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्हज, लडाख (HIAL) देखील प्रवेश दिला जात नाही. जेव्हा काही पत्रकार आले तेव्हा CRPF कर्मचाऱ्यांनी त्यांचा कॅम्पसमध्ये पाठलाग केला. परिस्थिती अधिकाधिक दमनकारी होत चालली आहे, असंही गीतांजली वांगचुक म्हणाल्या.

## यश ढाका क्रूर हत्ये प्रकरणी दोषी गुंडांना फाशी द्या : बाबूराव पोटभरे

### आमदार-खासदाराच्या तोंडाला कुलूप लागले का?

### जातियवाद्यांविरोधात डरकाळी फोडत पोटभरेंनी ढाका कुटुंबीयांची घेतली सांत्वन भेट

➤ बीड : प्रतिनिधी

बीड शहरात दिवसाढवळ्या उन्मादलेल्या जातीयवाद्यांनी अमानुषपणे यश ढाका या दलित तरुणाची अमानुषपणे हत्या केली आहे. या खूनाने सामाजिक असंतोष वाढला आहे. या घटनेची तातडीची चौकशी करून दोषी गुंडांना फाशी द्या. अशी मागणी बहुजन नेते बाबूराव पोटभरे यांनी केली. दरम्यान जिल्ह्यातील आमदार खासदारा यांच्या तोंडाला कुलूप लागले का? अशी डरकाळी जाती वाद्यांविरोधात फोडत पोटभरे यांनी ढाका कुटुंबीयांची मंगळवार (दि.30) रोजी दुपारी भेट घेतली.

बीड येथे अनुसूचित जातीतील पत्रकार देवेंद्र ढाका यांचा तरुण मुलगा यश ढाका याची जातीयवादी गुंडांनी अनमानुषपणे हत्या करून बीड जिल्ह्यामध्ये धुमाकूळ घातला आहे. या घटनेने व्यथीत झालेल्या पोटभरे यांनी ढाका कुटुंबीयांची



भेट घेतली. यावेळी त्यांनी जातीवाद्यांविरोधात डरकाळी फोडत संतप्त प्रतिक्रिया दिल्या. हरामखोरांना तात्काळ अटक करून त्यांना फाशी देण्यात यावी अशी मागणी पोटभरेंनी केली. पोटभरे म्हणाले की, दलित तरुणाचा निर्दयी खून हा केवळ एका कुटुंबावरच नव्हे तर संपूर्ण समाजावर घाव आहे. अशा घटनांना आळा घालायचा असेल तर दोषींना कठोर शिक्षा देणे गरजेचे आहे. अन्यथा समाजातील विश्वास ढासळेल. दरम्यान एवढी भयंकर घटना होऊनही जिल्ह्यातील आमदार खासदार तोंडाला कुलूप लावून बसले आहेत. दलित, पीडित, वंचित समाज यांना फक्त मतदानापुरताच लागतो का? असं ही ते यावेळी म्हणाले. दरम्यान बहुजन विकास मोर्च्याची सर्व टीम ढाका कुटुंबीयांच्या सोबत खंबीरपणे उभे राहिल असे आश्वासन त्यांनी यावेळी पीडित कुटुंबाला दिले. यावेळी त्यांच्यासोबत उपसभापती श्रीहरी मोरे, भीमराव टाकणखार, सदानंद प्रधान, शेख बाबा, जय तांगडे, शांतीदूत घोडके, सिध्दार्थ जोगदंड, अशोक हुंबरे यासह बहुजन विकास मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## धनंजय मुंडेंच्या माध्यमातून परळीतील ५ ग्रामपंचायत बांधकामास निधी मंजूर

### स्व. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेतून परळी मतदारसंघातील ५ ग्रामपंचायत बांधकामास १ कोटी १५ लाख निधी मंजूर

➤ परळी वैद्यनाथ : प्रतिनिधी

परळीचे आमदार तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील आणखी ५ ग्रामपंचायतींचे रुपडे पालटणार असून, स्वत:ची ग्रामपंचायत इमारत नसलेल्या ५ ग्रामपंचायतींच्या ग्रामपंचायत बांधकामास राज्य सरकारच्या वतीने एकूण १ कोटी १५ लाख रुपये निधी ग्रामविकास विभागाच्या वतीने मंजूर करण्यात आले आहेत.



धनंजय मुंडे यांच्या निर्देशानुसार मतदारसंघातील स्वत:ची इमारत नसलेल्या ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी निधी मागणी प्रस्तावित करण्यात आली होती. त्यानुसार ग्रामविकास विभागाने परळी तालुक्यातील मरळवाडी (२० लाख), लाडझरी (२५ लाख), रेवली (२५ लाख), तसेच अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा बुद्रुक (२५ लाख) व निरपणा (२० लाख) याप्रमाणे निधी मंजूर केला असून, याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

दरम्यान याआधी काही दिवसांपूर्वी आणखी ४ ग्रामपंचायत इमारतीस देखील याच योजनेतून निधी मंजूर करण्यात आलेला आहे. धनंजय मुंडे यांनी राज्य सरकार सह ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## केज येथे घरात वेश्या व्यावसाय; डमी ग्राहकास घरात नेतानाच पोलिसांनी मारला छापा

➤ केज : वसंत सोनवणे

केज येथील एका घरात वेश्या व्यावसाय असल्याची एका गुप्त खबऱ्या मार्फत माहिती मिळाली, सदर मिळालेल्या माहितीनुसार पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत व अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेच्या महिला पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव, महिला पोलीस राधा चव्हाण, सुलोचना वाळके यांच्यासह पथकातील कर्मचारी व केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्यासह केज पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी यांनी सदरची कारवाई केली, यामध्ये पिडीतेची सुटका करण्यात आली आणि व्यावसाय चालवणाऱ्या महिलेला अटक करून ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार दिनांक २९ सप्टेंबर२०२५ रोजी केज शहरातील उमरी रोडजवळील गणेश नगर भागात एक महिला ही आपल्या घरात वेश्या व्यावसाय चालवत असल्याची गुप्त खबऱ्याकडुन माहिती पोलिसांना मिळाली जिल्हा पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत व अप्पर पोलिस अधिक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सायंकाळी ५-०० वाजता ● पान २ वर...




## शेतकरी कुटुंबियासह नऊ ऑक्टोंबरला धरणात घेणार जलसमाधी

### अहो जिल्हाधिकारी साहेब! शिल्लेगाव मध्यम प्रकल्पाच्या मध्यभागी जमीन असूनही संपादित नसल्याने 21 वर्षांपासून पिके जातात पाण्याखाली!!

➤ गंगापूर : प्रतिनिधी

गंगापूर तालुक्यातील शिरेगाव येथील गट क्र. 57 मधील 53 आर जमीन प्रत्यक्ष शिल्लेगांव मध्यम प्रकल्पात असूनही संपादित न झाल्याने गेल्या 21 वर्षापासून धरणाला पाणी आल्यावर शेतकरी रमेश माणिकराव कराळे राहणार शिरेगाव यांची उभे पिके असलेली जमीन पाण्याखाली जातात



त्यामुळे त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होते सदर जमीन धरणाच्या मध्यभागी असूनही संपादित न झाल्याने ही नुकसान ● पान २ वर...

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वतःच्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# ऑक्टोबर महिन्यात देशात सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज, हवामान विभागाने दिली माहिती

नवी दिल्ली : भारतीय हवामान विभागाने ऑक्टोबर महिन्यासाठीचा हवामान आणि पावसाचा दीर्घकालीन अंदाज जाहीर केला आहे. या अंदाजानुसार, ऑक्टोबर महिन्यात संपूर्ण देशात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## देशातील पावसाचा अंदाज

ऑक्टोबर २०२५ मध्ये : देशात सरासरीपेक्षा जास्त, म्हणजेच दीर्घकालीन सरासरीच्या ११५ टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे. (ऑक्टोबर महिन्याची दीर्घकालीन सरासरी ७५.४ मिमी आहे.)

ईशान्य मान्सून (ऑक्टोबर ते डिसेंबर) : या मान्सूनोत्तर हंगामातही देशाच्या अनेक भागांमध्ये सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडेल. विशेषत : दक्षिण द्वीपकल्पीय प्रदेशात (तमिळनाडू, आंध्र प्रदेशचा किनारी भाग, रायलसीमा, केरळ आणि दक्षिण अंतर्गत कर्नाटक) सरासरीच्या ११२ टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य भारत आणि पूर्वेकडील राज्यांमध्येही सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज आहे. वायव्य भारत आणि ईशान्येकडील काही भागांमध्ये मात्र सरासरी ते सरासरीपेक्षा कमी पाऊस पडू शकतो.

## महाराष्ट्रावर काय परिणाम?

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ऑक्टोबर महिन्यात महाराष्ट्रातही सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे.

विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि कोकण या भागांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता अधिक आहे.

राज्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या परतीच्या आणि अतिवृष्टीच्या पावसामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. ऑक्टोबरमध्येही पावसाचा जोर कायम राहिल्यास शेतकऱ्यांची चिंता वाढण्याची शक्यता आहे.



## तापमानाचा अंदाज

ऑक्टोबर महिन्यात देशाच्या पूर्व–ईशान्य आणि वायव्य भागातील कमाल तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. देशाच्या इतर भागांमध्ये कमाल तापमान सामान्य किंवा सामान्यपेक्षा कमी राहू शकते.





# आर्दिका शेतकरी उत्पादक कंपनीची चिंचोली लिंबाजी येथील अजंता लॉन्समध्ये वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

चिंचोली लिंबाजी : सचिन गुरव

आर्दिका शेतकरी उत्पादक कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आले. कंपनीच्या वतीने कंपनीचे अध्यक्ष संगीता मनगटे यांनी कंपनीच्या वाटचालीविषयी मार्गदर्शन केले. या दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकऱ्याने शेतीच्या जोडधंद्याकडे वळावे असे कारभारी मनगटे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. व पैशाची कमी पडू देणार नाही अशी आश्वासन हिसाब बँकेचे अधिकाऱ्याने जोडधंदा करण्यासाठी आमची बँक तुमच्या पाठीशी आहे असे शेतकऱ्यांना आश्वासन दिले व दुग्ध व्यवसाय विषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. आर व्ही डोंगरदिवे मंडळ कृषी अधिकारी, ए आर ढाकरे बीटीएम डॉ. भगवत विखे पशुसंवर्धन विभाग डॉ. जयकुमार सावंत पशुसंवर्धन अधिकारी जाधव, एरिया मॅनेजर इसाब बँक क्लस्टर हेड ओंकार जी चव्हाण CBBO प्रतिनिधी अध्यक्ष संगीता मनगटे सचिव दीपक दशरथे उपाध्यक्ष कारभारी मनगटे कोषाध्यक्ष सूर्यकांत मोकासे संचालक सूर्यकला राजू वाकेकर संचालक ज्ञानेश्वर खुर्दे संचालक विजय गायकवाड सीईओ गणेश निकम व बरकतपुर येथील रामदास घुले तुकाराम घुले यांची सुद्धा उपस्थिती होती. चिंचोली लिंबाजी गावातील सखी व बचत गटाच्या महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ छत्रपती संभाजी नगर आदी मान्यवर उपस्थित होते.

# सांगवी पाटण येथे सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

### अखंड हरिनाम सप्ताहाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा : भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री

➤ आष्टी : समीर शेख

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा ७५० वा जन्मोत्सव (सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सव) तसेच ब्रह्मलीन संतश्री महंत शंकरपुरी मंगळपुरी महाराज पुण्यतिथी सुवर्ण महोत्सव सोहळ्याची सुरुवात गुरुवार दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी वैराग्यमूर्ती श्री सुदर्शन महाराज यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. हा सोहळा दि. ९ ऑक्टोबर २०२५ पर्यंत भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. कार्यक्रमाची सांगता महंत काशीनाथ महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाने होणार आहे.





➤ **दैनंदिन धार्मिक उपक्रम :**
पहाटे काकडा भजन, सकाळी श्री ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ज्ञानसत्र, संध्याकाळी हरिपाठ तर रात्री हरिकिर्तन व संगीत भजन अशा विविध कार्यक्रमांनी परिसरातील वातावरण हरिभक्तिमय होणार आहे.

➤ **प्रवचन व कीर्तनकार :**
ह.भ.प. उमेश महाराज दशरथे (आळंदी), ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (जळगाव), ह.भ.प. रामराव महाराज ढोक (नागपूर), ह.भ.प. उल्हास महाराज सूर्यवंशी (आळंदी), ह.भ.प. जयवंत महाराज बोधले (पंढरपूर), ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर), न्यायाचार्य महंत नामदेव महाराज (भगवानगड) यांसह अनेक संत प्रवचन व कीर्तनातून अध्यात्मिक मार्गदर्शन करणार आहेत.

➤ **संगीत भजनाचे वैशिष्ट्य :**
संगीतकार पंडित कल्याणजी गायकवाड, भजनसम्राट संगीतविशारद इंद्रमान गुरुजी, संगीत अलंकार सदानंद गुरुजी मगर, इंडियन आयडॉल राहुलजी खरे, संगीत अलंकार झूका गुरुजी यांसह पंचक्रोशीतील नामवंत गायक व मृदंगाचार्य आपली कला सादर करणार आहेत.

➤ **महंत स्थापना सोहळा :**
बुधवार दि. ८ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत महंत काशीनाथ महाराज शास्त्री यांचा २१ वे महंत स्थापना सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. या महोत्सवाचे आयोजन समस्त ग्रामस्थ सांगवी (पाटण) व पंचक्रोशीतील संतसेवक मंडळींनी केले असून, परिसरातील भाविक व वारकरी संप्रदाय यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.





# सांगवी (पा) येथील शिक्षक डॉ.अशोक उढाणे, राहूल मुटकुळे, जाधव, पालवे यांच्या बदलीने अख्खं गाव ढसाढसा रडले!

➤ **आष्टी : प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील जि.प उच्च प्राथमिक शाळा सांगवी(पा) येथील शिक्षक डॉ.अशोक उढाणे, राहुल मुटकुळे, लताबाई जाधव, कुंदा पालवे यांनी गेली सात वर्षे उत्कृष्ट ज्ञानदानाचे कार्य करून अनेक विद्यार्थी घडवले. गावातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि शिस्त प्रशंसनिय झाली असून शालेय स्पर्धा परीक्षेमध्येही शाळेला उल्लेखणीय यश मिळाले आहे. या गुणवंत शिक्षकांची बदली झाल्याने निरोप आणि स्वागत समारंभ कार्यक्रम शाळा आणि ग्रामस्थांनी आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी आदर्श सरपंच दत्तात्रय खोटे हे होते.

या भावनिक कार्यक्रमाच्या प्रसंगी जीवलग शिक्षकांची बदली झाल्याने विद्यार्थी, ग्रामस्थ आणि पालकांना अश्रू अनावर झाले. डॉ.अशोक उढाणे सर यांनी गेल्या सात वर्षांत शाळेची गुणवत्ता उंचावण्यासाठी सर्व शिक्षकांनी, सरपंच, ग्रामस्थ आणि पालकांनी घेतलेले परिश्रम व त्यातून निर्माण झालेली आदर्श शाळा आणि झालेले गावचे उत्कृष्ट शालेय वातावरण, सर्व ग्रामस्थांनी केलेल्या बहुमोल सहकार्यातून आज उभी असलेली सुंदर शाळा याबाबत अत्यंत भावनिक भाषण केले. यावेळी गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं सदस्य, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, सर्व ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी लाडक्या शिक्षकांना निरोप देताना अक्षरशः ढसाढसा रडले. शिक्षकांचे असणारे उत्कृष्ट शैक्षणिक कार्य आणि सामाजिकता याचा यावेळी प्रत्यय आला. कार्यक्रम प्रसंगी मुख्याध्यापक चांगदेव तरटे प्रास्ताविक केले तर उपक्रमशिल शिक्षक राहुल मुटकुळ, लताबाई जाधव, कुंदा पालवे यांनी शालेय कार्य आणि शाळेतील आठवणींना उजाळा दिला. सरपंच दत्तात्रय खोटे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख, ह.भ.प बाबासाहेब झिंजुर्के, विजय मरकड, अमोल खिलारे, लक्ष्मण कर्डिले, नारायण गवारे सर यांनी शिक्षकांच्या कार्याचे कौतुक केले आणि सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर जीवापाड प्रेम केले आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास व्हावा यासाठी शालेय स्पर्धा परीक्षा, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक सहल, लेझिम, भाषण, हस्ताक्षर, चित्रकला तसेच विविध मैदानी स्पर्धांच्या माध्यमातून सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडविण्याचे काम केले. यावेळी पोटे सर, देशमुख सर, बोराडे सर, राजपूत मॅडम यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आजिनाथ साखरे, समीर शेख यांनी तर आभार वैशाली खकाळ यांनी मानले. कार्यक्रमासाठी सरपंच दत्तात्रय खोटे, उपसरपंच राहुल खिलारे, ग्रा.प सदस्य शेषराव भोसले, लक्ष्मण भोसले, महादेव गवारे, बाबासाहेब भोसले, युवा नेते राजेंद्र भोसले, बाबासाहेब झिंजूर्के सर, अध्यक्ष भुषण खिलारे, शिवाजी खिलारे, आश्रजी खिलारे, विजय मरकड, सद्दाम शेख, विजय खिलारे, गणेश भोसले, नारायण गवारे सर, अमोल खिलारे, तुकाराम भोसले, डॉ. राम पवार, महेश भगत, शहादेव गवारे, लक्ष्मण कर्डिले, गणेश भोसले, विवेक खिलारे, संदीप खिलारे (फौजी), राघव खिलारे, सागर सुरवसे, माऊली भोसले, लहू खिलारे, महेश धस, बशीर शेख, दिपक खिलारे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख दिसत आहेत.

# प्रा.आजिनाथ शेरकर यांना क्रांतीसुर्य प्रेरणा पुरस्कार प्रदान; पुरस्काराने जबाबदारी वाढली - शेरकर



बीड : प्रतिनिधी

बीडच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व व्यसनमुक्ती क्षेत्रात मागील १४ वर्षांपासून अखंड अविरत कार्य करत असलेल्या प्रा. आदिनाथ शेरकर यांना नुकताच नाशिक येथे परशुराम सायखेकडर नाट्य मंदिरात क्रांतीसुर्य प्रेरणा पुरस्कार २०२५ पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र शासन संयुक्त विद्यमाने संपुर्ण महाराष्ट्रात पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती, व केंद्र शासनाच्या सहकार्याने देश पातळीवर संपुर्ण देशात युवा आदान प्रदान कार्यक्रमातुन सांस्कृतिक कार्यक्रम व आतंरराष्ट्रीय पातळीवर चिन या देशात सांस्कृतीक नेतृत्व करणारे शेरकर यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

आकाशवाणी, दूरदर्शन वरुन विविध कार्यक्रमाची निर्मिती देखील त्यांनी या पुर्वी केली असे माध्यमाशी बोलताना त्यांनी सांगितले दरम्यान मिळालेल्या या यशाबद्दल त्यांचे विविध माध्यमांतून सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## केज येथे घरात वेश्या व्यावसाय;

● पान १ वरून... ...च्या सुमारास गुप्त खबऱ्या मार्फत मिळालेल्या बातमीची शहानिशा करून एक डमी ग्राहक पाठवून तपासाची चक्रे वेगाने सुरु केली ग्राहक पिडीत महिलेला रुममध्ये घेवून जाताच पोलिसांनी धाड टाकून ५२, वर्षीय वेश्या व्यावसायीक महिलेला ताब्यात घेऊन अटक केली. यातील आरोपी हिने पिडीत महिलेला स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी बोलावून स्वतःचे ताब्यातील जागेचा वापर करून त्याच कमाईवर उदर निर्वाह करून वेश्या व्यावसाय करण्यास लावले व सदर महिलेचे शोषण करण्याच्या उद्देशाने बोलावले म्हणूनया प्रकरणी पल्लवी भाऊसाहेब जाधव यांच्या फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध गु.र.नं.५३१/२०२५ कलम ३,४,५,६ अन्वये अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा(पिटा)१९५६ प्रमाणे दाखल अंमलदार मपोह/१२९४ दगडखैर यांच्या कडे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर घटनेचा पुढील तपास हा वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे हे करत आहेत. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत व अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली मानवी वाहतूक शाखेच्या महिला पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव व पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे, पोलीस हवालदार बाळासाहेब अहंकारे, प्रकाश मुंडे, महिला पोलीस सुलोचना वाळके, राधा चव्हाण यांच्यासह अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने केली आहे. सदरच्या कारवाईमुळे छुपा वेश्या व्यवसाय व अवैध्य धंदे चालविणाऱ्यांना धडकी भरली असून सदरच्या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## धरणात घेणार जलसमाधी

● पान १ वरून... सहन करावे लागते त्यामुळे लवकरात लवकर ही जमीन संपादित करून मावेजा मेळावा अन्यथा 9 ऑक्टोबर रोजी शिल्लेगाव मध्यम प्रकल्पात कुटुंबीयांसह जलसमाधी घेणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. दरम्यान काल झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर शेतकऱ्याची संपूर्ण क्षेत्रातील मक्का पीक धरणात पाणी आल्याने पाण्याखाली गेली आहे त्यामुळे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लाखो रुपयांचे नुकसान सदर शेतकऱ्याचे झाले आहे त्यामुळे पंचनामे करून नुकसान भरपाई मिळण्याचेही मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

# गौतमी पाटीलच्या गाडीला पुण्यात अपघात, रिक्षाचालकासह ३ जखमी



➤ पुणे : प्रसिद्ध नृत्यांगणा गौतमी पाटील हिच्या कारला पुण्यात भीषण अपघात झाला. पुणे-मुंबई-बंगळूरू राष्ट्रीय महामार्गावरील वडगाव पुलाजवळ (नवले ब्रिज परिसरात) हा अपघात झाला असून, यामध्ये रिक्षाचालकासह तीन जण जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे-मुंबई-बंगळूरू राष्ट्रीय महामार्गावरील वडगाव पुलाजवळ एका हॉटेलसमोर एक रिक्षा उभी होती. गौतमी पाटीलच्या भरधाव वेगातील कारने या उभ्या असलेल्या रिक्षाला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडक इतकी जबरदस्त होती की, रिक्षाचे मोठे नुकसान झाले. या अपघातात रिक्षाचालकासह रिक्षातील दोन प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघाताच्या वेळी नृत्यांगणा गौतमी पाटील ही तिच्या गाडीमध्ये नव्हती, असे पोलिसांनी सांगितले आहे. पोलिसांनी गौतमीच्या वाहन चालकाला तातडीने ताब्यात घेतले आहे आणि पुढील तपास सिंहगड रोड पोलीस करत आहेत.

ड्रायव्हरच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाला की, यामागे अन्य कोणते तांत्रिक कारण आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतुकीवर काही प्रमाणात परिणाम झाला होता.

# रेबीज प्रतिबंधक लसचा मोठ्याप्रमाणात तुटवडा

मुंबई : मुंबईला सन वर्ष २०३० पर्यंत रेबीजमुक्त करण्याचा महानगरपालिकेचा संकल्प करत सन २०२३ पासून आतापर्यंत १ लाखांहून अधिक श्वानांचे लसीकरण करण्यात आल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला. मात्र, रेबीज नियंत्रणासाठी श्वानांच्या लसीकरणावर भर देणाऱ्या महापालिका आरोग्य खात्याला श्वानांनी चावा घेतल्यानंतर त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लसींच उपलब्ध करून देण्याकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे महापालिका आरोग्य विभागाला माणसांपेक्षा आता श्वानांचीच अधिक काळजी असल्याचे दिसून येत आहे.

रेबीज आजार हा झूनॉटिक आजारांपैकी एक असून सर्वसामान्यत: श्वानामार्फत हा आजार संक्रमित होतो. रेबीज आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्यास हा आजार पूर्णपणे, १०० टक्के टाळता येण्यासारखा आहे. दरवर्षी २८ सप्टेंबर रोजी 'वर्ल्ड रेबीज डे' साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट रेबीजविषयी जनजागृती करणे आणि 'वन हेल्थ' दृष्टिकोनातून या रोगाच्या नियंत्रणातील प्रगती अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला जातो.

मात्र, एका बाजुला श्वानांच्यी लसीकरणावर भर दिला जात असला तरी भटक्या श्वानांनी चावा घेतल्यास त्यावर उपाय म्हणून रेबीज प्रतिबंधक लसचा तुटवडा मोठ्याप्रमाणात महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये निर्माण झाला आहे.



रेबीजच लसींच्या पुरवठ्याची प्रक्रियाच थांबल्याने सध्या कुठल्याही रुग्णालयांमध्ये या लसी उपलब्ध नाहीत. त्यामुळे स्थानिक पातळीवर या लसी खरेदी केल्या जात आहेत. महापालिकेच्यावतीने रेबीज लसींच्या खरेदीला मंजुरी मिळाली असली तरी प्रत्यक्षात नियुक्त कंपनीलाच कार्यादेश न दिल्यामुळे अद्यापही याची खरेदीची प्रक्रिया सुरु झालेली नाही. त्यामुळे स्थानिक पातळीवर अधिक दराने लसींची खरेदी केली जात आहे. ज्यामध्ये लसींची खरेदी अधिक दराने केली जात असल्याने महापालिकेच्या तिजोरीवरील भार वाढत चालला असून लस तातडीने उपलब्ध होत नसल्याने रुग्णांच्या नातेवाईकांना बाहेरुन आणण्यास भाग पाडले जाते.

श्वान दंश लसीकरण कार्यक्रमांतर्गत मुंबईत एकूण १४६ श्वानदंश लसीकरण केंद्र आणि ८४ आपला दवाखाना याठिकाणी भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्यास प्रतिबंधक मोफत लसीकरण करण्यात येते.

यापूर्वी महापालिकेने खरेदी केलेल्या लसींचे कंत्राट मार्च २०२४ रोजी संपुष्टात आल्यानंतर महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने स्थानिक पातळीवर याची खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे दोन ते तीन महिन्यांसाठी या लसींची खरेदी केली जात असून शेवटची खरेदी ही मे आणि जून २०२५ या महिन्यांकरता १८००० लसींची केली होती.

महापालिकेला मासिक १२ हजार रेबिज प्रतिबंधात्मक लसींची आवश्यकता असते. त्यामुळे यापूर्वी खरेदी करूनही विविध केंद्रात पुरवठा केलेल्या या लसींचा तुटवडा जाणवू लागला. त्यामुळे अनेक ठिकाणी श्वानांनी चावा घेतल्यानंतर महापालिकेच्या केंद्रात आणि आपला दवाखान्यात आलेल्या नागरिकांना लस उपलब्ध नसल्याने माघारी जावे लागते किंवा नागरिकांना बाहेरुन आणून दिल्यास त्याचे लसीकरण करून दिले जात असल्याची माहिती मिळत आहे.

# संस्कृती आणि परंपरा समजून घेण्याची ही एक योग्य वेळ





दसरा म्हणजे विजयाचा, उत्सवाचा आणि आनंदाचा दिवस. पण आजच्या काळात या सणाचा अर्थ फक्त सुट्टी, नवीन कपडे आणि बाहेर जेवण इतकाच उरलेला आहे. विशेषत: लहान मुलांसाठी. अभ्यासाचा ताण, इंग्रजी माध्यमातील शिक्षण आणि आधुनिक जीवनशैली यामुळे सणांचे पारंपरिक स्वरूप आणि त्यामागचा खरा अर्थ मुलांपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे यंदा दसरा साजरा करताना पालकांनी ठरवून मुलांनाही या आनंदात सहभागी करा आणि सणाचे महत्व समजावून सांगा.

## सणासुदीच्या काळात मुलांना थोडी विश्रांती द्या

दसऱ्याच्या सुमारास बहुतांश शाळांमध्ये सहामाही परीक्षा सुरू असतात. पण तरीही मुलांना अभ्यासापासून काही वेळ बाजूला ठेवून सणात सहभागी होण्याची संधी द्या. केवळ मौजमजा नव्हे तर भारतीय संस्कृती आणि परंपरा समजून घेण्याची ही एक योग्य वेळ असते.

## दसऱ्याचा इतिहास आणि महत्तव समजावून सांगा

रावणाचा पराभव करून प्रभू श्रीरामांनी धर्माचा विजय कसा साधला, हे मुलांना सोप्या शब्दांत समजवा. दसरा म्हणजे वाईटावर चांगल्याचा विजय — हे तत्व त्यांनी मनापासून समजून घेतलं पाहिजे. केवळ रावणाचा पुतळा जळतो, इतकं सांगणं पुरेसं नाही. त्यामागची गोष्ट, मूल्यं आणि संस्कृती त्यांना कळायला हवीत.

## घर सजावटीत सहभागी करून घ्या

दसऱ्याच्या दिवशी झेंडूची फुलं, आंब्याच्या पानांचे तोरण, रांगोळ्या याने घर सजवलं जातं. मुलांना या सजावटीत सामील करून घ्या. त्यांच्या कल्पकतेला



प्रोत्साहन द्या. या निमित्ताने त्यांच्यात कला, संयम आणि सहकार्य यांचा विकास होतो.

## सरस्वती पूजनात भाग घ्यायला लावा

या दिवशी ज्ञानदेवतेचं पूजन केलं जातं. मुलांना आपली वही, पुस्तकं, लेखन साहित्य पूजायला सांगा. त्यातून शिक्षणाचं महत्त्व, कृतज्ञता आणि नम्रतेची भावना त्यांच्या मनात रुजेल.

## आपट्याच्या पानांचे महत्व शिकवा

दसऱ्याला सोनं समजून आपट्याची पानं एकमेकांना दिली जातात. ही परंपरा सांभाळण्यासाठी मुलांना सोबत घेऊन शेजाऱ्यांना, नातेवाईकांना ही पानं वाटा. यामुळे त्यांच्या सामाजिक कौशल्यात वाढ होते आणि त्यांना देणगी व परोपकाराचे मोल कळते.

## रामलीला किंवा घरगुती नाटकांचे आयोजन करा

मुलांना मनोरंजक पद्धतीने रामायणातील कथा सांगण्यासाठी त्यांना रामलीला दाखवा किंवा घरातच लहानसं नाटक सादर करा. यामुळे सणाचा आनंद द्विगुणित होईल आणि कथा लक्षातही राहतील.

## दसरा म्हणजे केवळ सण नव्हे, संस्कारांची संधी!

एकत्रित सण साजरे करताना घरातला आनंद वाढतो आणि मुलांना चांगली सवय लागते. त्यामुळे यंदाचा दसरा फक्त 'सण' म्हणून न साजरा करता, तो एक संस्कृतीचे शिक्षण देणारा अनुभव बनवा, जो मुलांच्या मनात कायमचा घर करून बसेल.

## मुलांना गरबा खेळण्यासाठी पाठवा

गरबा नृत्य हा केवळ मनोरंजन नाही तर मुलांच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी फायदेशीर आहे. यामुळे त्यांची तंदुरुस्ती वाढते, शरीरातील चरबी वेगाने कमी होते, शरीरात ऊर्जा राहते आणि सांस्कृतिक ओळख मजबूत होते. तसेच, टीमवर्क आणि अनुशासन शिकण्यास मदत होते, जे मुलांच्या सामाजिक विकासासाठी आवश्यक आहे.



# फिलिपीन्सला भूंकपाचा मोठा तडाखा, अनेक इमारती कोसळल्या, २० जणांचा मृत्यू


मनिला : फिलीपीन्समध्ये मंगळवारी ६.९ रिश्टर स्केल तीव्रतेचा शक्तीशाली भूकंप आला. यामुळे देशाच्या अनेक भागांमध्ये हाहाकार माजला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक इमारती कोसळल्या आहेत तसेच यात कमीत कमी २० जणांचा मृत्यू झाला आहे. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने याची माहिती दिली. भूकंपाचा केंद्र आणि प्रभावित क्षेत्राबाबतची माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. मात्र प्राथमिक अंदाजानुसार भूकंपामध्ये मोठी हानी झाल्याचे वृत्त आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार स्थानिक वेळेनुसार दुपारच्या सुमारास अनेक भागांमध्ये भूकंपाचे मोठे झटके जाणवले. यात लोकांमध्ये एकच गोंधळ झाला. अनेक लोक घर-कार्यालयांच्या बाहेर आले. भूकंपाचे झटके इतके तीव्र होते की खासकरून अनेक जुन्या इमारती कोसळल्या. यात ढिगाऱ्याखाली अनेक जण दबले गेले.

भूकंपाच्या तीव्रतेमुळे अनेक भागात वीज पुरवठा खंडित झाला आहे. अंधार आणि भूकंपाचे आफ्टरशॉक येत असल्याने बचावकार्यात अडथळे येत आहेत. सेबूच्या गव्हर्नरने लोकांना शांत राहण्याचे आणि कोसळणाऱ्या वास्तू व भिंतींपासून दूर, मोकळ्या जागेत राहण्याचे आवाहन केले आहे.

फिलिपिन्स इन्स्टिट्यूट ऑफ व्होल्कॅनोलॉजी अँड सीस्मोलॉजीने सुरुवातीला त्सुनामीचा किरकोळ धोक वर्तवला होता आणि किनारी भागातील लोकांना दूर राहण्यास सांगितले होते. मात्र, नंतर पॅसिफिक त्सुनामी वॉर्निंग सेंटरने त्सुनामीचा कोणताही धोका नसल्याचे स्पष्ट केले.

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळ्लाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंत:करण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंत:करण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | म्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

विशेष

## घळाटी नदीवर रूंद व उंच पुल द्या



### ग्रामस्थांचे आ. प्रकाशदादा सोळंके यांना निवेदन

माजलगाव / प्रतिनिधी : तालुक्यातील घळाटवाडी येथील घळाटी नदीवर रूंदीचा व उंचीच्या पुलास मंजुरी द्या अशी या मागणीचे निवेदन आमदार प्रकाशदादा सोळंके यांना उपसरपंच अनुभाउ घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि . २९ सोमवारी देण्यात आले .

तालुक्यातील घळाटवाडी येथील घळाटी नदीला झालेल्या अतिवृष्टीने मोठा पुर आला होता . घळाटी नदीवर कमी उंचीचा व अरूंद असलेला जुना पुल या पुराच्या पाण्याने पुर्णत : वाहुन गेला . परिणामी या पुलावरून ये – जा करतांना जिवघेणी कसरत ग्रामस्थांना करावी लागत होती . त्यामुळे उपसरपंच अनुपभाउ घाडगे यांनी याची दखल घेत घळाटी नदीवर रूंदीचा व उंचीच्या पुलास मंजुरी द्या या मागणीचे निवेदन आमदार प्रकाशदादा सोळंके यांना दिले . यावेळी ज्योतिराम पठाडे, बाबा काटे, दिनकर पठाडे, नवनाथ जाधव, पंडित भुतकर, राजेंद्र भोसले, राजु कुलथे, बाळु जाधव, शाम दराडे यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते . दरम्यान ग्रामस्थांना ये – जा करण्यासाठी पर्यायी रस्ता नसल्याने ग्रामस्थांना गैरसोयीचा मोठा सामना करावा लागत आहे . त्यामुळे लवकरात लवकर पुल द्या अशी आग्रही मागणी ग्रामस्थांनी केली .



घळाटी नदी छोटा पूल तोडून अशी वाहत आहे

## माणसांसाठी धावली माणुसकी



### बाराभाई तांड्यातील तरुणांनी पूरग्रस्तांची भागवली भूक

➤माजलगाव / प्रतिनिधी :
सध्या महाराष्ट्रात पावसाने थैमान घातलेला असून बीड जिल्हा सह मराठवाड्यामध्ये महापुराच्या पाण्याने काही गाव व लोकांचे संसार उध्वस्त झालेले आहेत . माजलगाव तालुक्यातील शेलगाव रिधोरी कवडगाव हिवरा हे गाव गोदावरीच्या काठावर वसलेले असून गोदाकाटच्या या गावांना पुराचा सगळ्यात मोठा फटका बसलेला आहे सध्या नाथसागर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी झाल्यामुळे धरणामध्ये येणाऱ्या पाण्याची आवक जास्त झाल्यामुळे पाटबंधारे प्रशासनाने गोदावरी पात्रामध्ये अडीच लाख क्युसेस पेक्षा जास्त पाणी गोदावरी पात्रात सोडलेले आहे गोदापात्रात पाणी सोडल्यामुळे या गावांमध्ये पाण्याने शिरकाव केलेला आहे गावामध्ये पाणी शिरल्यामुळे लोकांचा सामान्य जनजीवन विस्कळीत झालेला असून त्यांना प्रशासनाने खबरदारी करता वरील गावातील लोकांचे स्थलांतर केलेले असून यांची राहण्याची व्यवस्था सरस्वती विद्यालय राजेगाव व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजेगाव आणि डॉक्टर जनक चौरे यांचे अजय क्लिनिक या ठिकाणी केलेले आहे . सदरील पुराची बाब लक्षात घेता बाराभाई तांड्यातील तरुणांनी जातपात धर्म बाजूला ठेवून माणुसकी हीच जात आणि धर्म असे मनात ध्येय धरून या पूरग्रस्तांची या पुरग्रस्तांचे भूक भागवली आहे . यावेळी बाराभाई तांड्याचे सरपंच संतोष गुलाबराव जाधव ,ज्ञानेश्वर पंडित राठोड, करण गणेश जाधव ,सतीश विष्णू राठोड, सुनील बबन जाधव, आकाश विनायक जाधव ,पृथ्वीराज बळीराम जाधव,असे अनेक तरुण एकवटलेले होते .

### तुकाराम साळवे यांचे निधन



माजलगाव / प्रतिनिधी : तुकाराम विठ्ठलराव साळवे वय वर्ष ८५ यांचे मंगळवारी दि .३० दीर्घ आजाराने केसापुरी येथे निधन झाले . अत्यंविधी बुधवारी दि .१सकाळी १० वाजता केसापुरी ता . माजलगाव जि .बीड या ठिकाणी होणार आहे . त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे . ते माजी सरपंच विलास साळवे यांचे वडील होत .

# विद्युत रोहित्र साठीची नियुक्त बजाज एजन्सी कडून पूरग्रस्तांसह महावितरण ला ही फसवण्याचा प्रयत्न

## ➤ एजन्सी वर कार्यवाहीची मागणी



➤माजलगाव : प्रतिनिधी
माजलगाव तालुक्यातील फुले पिंपळगाव येथील कोरडे वस्तीवर शासन मान्य डीपी फिल्टर एजन्सी नामे बजाज यांच्याकडून नादुरुस्त असलेले विद्युत रोहित्र पूरग्रस्त जनतेच्या माथी मारण्यात येत आहेत तर दुरुस्त आणि चांगल्या रोहित्राचा बाजार मांडला जात आहे पूर परिस्थितीमुळे लाखो शेतकऱ्यांचे संसार पाण्यात जाऊन उघड्यावर पडले आहेत महावितरने एजन्सीला रोहित्र दुरुस्तीचे टेंडर दिले आहे त्या बजाज एजन्सी कडून पूरग्रस्त शेतकऱ्याची फसवणूक तर करण्यात येत आहेच मात्र महावितरणच्या ही डोळ्यात धडधड अंजन घालण्याचा प्रयत्न चालू आहे नादुरुस्त विद्युत रोहित्र पूरग्रस्त तथा भोळ्या भाबड्या गावकऱ्यांना बसवून देऊन शेतकऱ्याची फसवणूक करून शेतकऱ्यांच्या दु :खावर मीठ चोळण्यासारखे प्रकार करीत आहे तर दुरुस्त्याने चांगल्या क्वालिटीचे रोहित आठ हजार पासून ते पंचवीस हजार पर्यंत च्या किमतीत बाहेर जिल्ह्यात विकले जात आहेत महावितरण चे जिल्हाध्यक्ष राजपूत यांना यापूर्वीच कल्पना दिलेली आहे आपल्या जिल्ह्यातून डीपी विद्युत रोहित्र याची मोठ्या प्रमाणात तस्करी चालू आहे मात्र या गोष्टीकडे अधीक्षक अभियंता राजपूत यांनी दुर्लक्ष केल्यामुळे सदर योजनेचे मोठ्या प्रमाणात मनोबल वाढले आहे फुले पिंपळगाव येथील सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार शेख जुनेद यांनी मुख्य अभियंता महावितरण अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता अंबाजोगाई माजलगाव येथील बजाज डीपी फिल्टर एजन्सीवर कारवाई करावी म्हणून मोबाईल द्वारे संपर्क केलेला आहे त्या अनुषंगाने मुख्य अभियंता यांनी एजन्सीवर कार्यवाही करावि अशी मागणी केली आहे मात्र अधीक्षक अभियंता याकडे कोणत्या नजरेने पाहत आहेत याकडे लक्ष लागले आहे वास्तविक पाहिले तर विद्युत रोहित्र फेल झाल्यानंतर लाईनमन हे जे इ यांना विद्युत रोहित्र फेल झाला म्हणून माहिती देत असतो त्यानंतर जे इ हा फेल रिपोर्ट तयार करून उपअभियंता यांची स्वाक्षरी घेऊन कार्यकारी अभियंता यांच्याकडे सदर माहिती पुरविली जाते कार्यकारी अभियंता यांच्याकडून ज्या एजन्सीला ट्रान्सफॉर्मर रिपेरिंगची ऑर्डर दिलेली आहे त्या एजन्सीला कल्पना देऊन फेल झालेला ट्रांसफार्मर घेऊन त्या ठिकाणी नवीन ऑइल बदलून ट्रान्सफॉर्मर रिपेअर करून दिला जातो परंतु माजलगाव तालुक्यामधील बजाज एजन्सी कडून शासनाला चुना लावण्याचे काम चालू आहे म्हणजेच ट्रांसफार्मर फेल झाल्यानंतर त्यामधील कोणतीही ऑइल न बदलून देता आहेत तसे परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना व पूर ग्रस्त लोकांना रोहित्र देऊन शासनाकडून पैसे उकळण्याचे काम चालू आहे परंतु महावितरणचे अधिकारी डोळे झाक करण्याचे काम करीत आहे म्हणून संबंधित एजन्सीवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असे सामाजिक कार्यकर्ते शेख जुनेद यांनी सांगितलेले आहे

आता तरी अधीक्षक अभियंता रजपूत साहेब बीड जिल्ह्या बाहेर होणारी रोहित्रा ची तस्करी थांबवून बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त आणि संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना कसा न्याय मिळेल यासाठी प्रयत्न करतील अन्यथा एजन्सी सोबत महावितरण चा सहभाग आहे असे गृहीत धरून भविष्यात मोठ्या प्रमाणात आंदोलन केले जाईल असेही सामाजिक कार्यकर्त्यांकडून सांगितले आहे .

## सोळंके साखर कारखान्याचा आज ३४ वे बॉयलर अग्निप्रदिपन समारंभ



➤माजलगाव : प्रतिनिधी
तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके कारखान्याचा ३४ बॉयलर अग्निप्रदिपन समारंभ सोहळा आज दि .१ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला आहे .तरी या समारंभास कारखान्याचे सभासद, ऊस उत्पादक शेतकरी यांनी उपस्थित राहावे .असे आवाहन करण्यात आले आहे .

तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा सन २०२५\२६ चा ऊस गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदिपन समारंभ आज दि .१ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे .ह .भ .प .महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या शुभ हस्ते व आ .प्रकाश दादा सोळंके ,जेष्ठ मार्गदर्शक धैर्यशील काका सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली व कारखान्याचे चेअरमन विरेंद्र दादा सोळंके, व्हा .चेअरमन जयसिंह भैया सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीत संचालक दत्तात्रय पुसाराम दुधाने व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ .अंजनाताई दत्तात्रय दुधाने या उभयतांच्या हस्ते विधीवत पुजनाने होणार आहे .

तरी या बॉयलर अग्निप्रदिपन समारंभास कारखान्याचे सर्व सभासद, सभासद ऊस उत्पादक शेतकरी,ऊस तोडणी वाहतुकदार, ऊस तोडणी मुकादम, पत्रकार यांच्यासह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे .असे आवाहन कार्यकारी संचालक आर .सी . बडगुजर यांनी केले आहे .

## गुटखा व घरगुती वापराचे गॅस बेकायदेशीर हॉटेलवर वापरणाऱ्याविरुध्द छापा





➤माजलगाव : प्रतिनिधी
रात्रगस्त दरम्यान गोपनिय माहीतीच्या आधारे मिळालेल्या माहीतीवरुन माजलगांव शहर पोलीसांनी माजलगांव शहरातील आरबीएल बँकेच्या बाजुस असलेल्या देशमुख नावाचे हॉटेलवर दि २९ रात्री ११ :५० वाजता छापा मारुन हॉटेलमधुन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला विविध कंपनीचा गुटखा तसेच हॉटेलवर बेकायदेशीर वापर चालु असलेले एचपी कंपनीचे तीन गॅस सिलेंडर असा एकुण २२,९५९/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन हॉटेल चालक मुद्दसिर महेबुब देशमुख रा . केसापुरी कँप माजलगांव ता . माजलगांव जि .बीड याचे विरुध्द गु .र .नं . ३५५/२०२५ कलम १२३,२२३,२७४,२७५ भारतीय न्याय संहीता सह कलम ३,७ जिवनावशक वस्तु अधिनियम प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे . सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, शैलेश गायकवाड उपविभागीय पोलीस अधिकारी, माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोहेकॉ/गणेश तळेकर, पोहेकॉ/माधव तोटेवाड, होमगार्ड अशोक पतंगे यांनी केली आहे .

## महाविद्यालयीन जीवनातच स्वत:ची ओळख निर्माण करा - ॲड. रुक्मीण बागल



➤माजलगाव / प्रतिनिधी :
महाविद्यालयीन जीवनातच स्वत :ची ओळख निर्माण करायला हवी असे प्रतिपादन विधीज्ञ ऍड . रुक्मीण बागल यांनी केले . सिद्धेश्वर महाविद्यालय अंतर्गत तक्रार निवारण समिती व सखी सावित्री समिती यांच्या वतीने नवरात्र निमित्त महाविद्यालयात "दिवस तुझे हे फुलायचे" या विषयावर आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या .

अध्यक्षस्थानी स्त्री रोग तज्ञ डॉ . प्रज्ञा जोशी या तर अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रमुख डॉ . प्रेमनंदा घडसिंग, सखी सावित्री मंचच्या प्रमुख प्रा . सुवर्णा पांचाळ उपस्थित होत्या . पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, आजच्या काळात शिक्षण व करिअरवर आपण जास्त लक्ष देण्याची गरज आहे आजचा जमाना हा आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ए . आय . ) चा आहे . ज्ञान हे आपल्या दारामध्ये येऊन उभा आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही . मग त्याचा सदुपयोग करायचा की दुरुपयोग करायचा हे आपणच ठरवले पाहिजे . या काळामध्ये आपण योग्य ती खबरदारी व निर्णय घेतले तर भविष्यात आपण नक्कीच यश संपादन करू .

अध्यक्षीय समारोपात डॉ . प्रज्ञा जोशी म्हणाल्या की, नवरात्र उत्सव हा भारतीय संस्कृतीतील एक अद्वितीय असा सण आहे . या काळामध्ये नऊ दिवस देवीचे उपवास करून लोक देवीची मनोहर भावे प्रार्थना करतात . ज्यामधून आपणास आपली मानसिक व शारीरिक स्थिती संतुलित राखण्याचे काम केले जाते . नवरात्र उत्सव हा नऊ दिवसच का साजरा केला जातो याचे महत्त्व देखील त्यांनी विद्यार्थिनींना समजावून सांगितले . प्रास्ताविक प्रा . सुवर्णा पांचाळ यांनी केले . सूत्रसंचालन काटूळे ऋतुजा बालासाहेब हिने केले तर आभार प्रा . प्रतिभा जाधव यांनी मानले .

या कार्यक्रमास प्रा . स्वाती साखरे, प्रा . प्रीती कळसणे, प्रा . मंदा मस्के, प्रा .पूजा सिंग, प्रा . पूजा मस्के, सौ . स्वाती धर्माधिकारी, आशा कांबळे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनींची उपस्थिती मोठ्या संख्येने होती .

## सुजात आंबेडकर यांची देवेंद्र ढाका यांच्या घरी सांत्वनपर भेट



बीड / प्रतिनिधी :
वंचित बहुजन आघाडीचे युवानेते सुजात आंबेडकर यांनी बीड येथील पत्रकार देवेंद्र ढाका यांच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे दु :खात सहभागी होत सांत्वन केले .

या वेळी वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते अरुण आबा जाधव, जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर, भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दलाचे कॅप्टन राजभाऊ आठवले अमरसिंह ढाका, सचिन मेघडंबर, समाजसेविका आम्रपाली साबळे, अँड . अविनाश गंडले, रामसिंग टाक, आदी मान्यवर उपस्थित होते .सांत्वन भेटीदरम्यान वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून ढाका कुटुंबियांच्या दु :खात सहभागी झाले .

## माजलगावात ओला दुष्काळ जाहीर करून ,लाडक्या बहिणींना दिवाळीला दोन हप्ते द्या - उपसरपंच अनिल राधे कांबळे



➤माजलगाव :प्रतिनिधी
लाडक्या बहिणींना केवायसी केल्यानंतर हप्ता दिला जाईल असे शासन सांगत आहे परंतु दिवाळीला एकत्रित दोन हप्ते द्या व माजलगावात ओला दुष्काळ जाहीर करून एकरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई द्या अशी मागणी उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी शासनाकडे केले आहे .

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना ई केवायसी करा त्यानंतर लाभ मिळेल असे संकेत शासनाने दिले आहेत परंतु ऐन सणासुदीच्या काळात ई केवायसी चे फर्मान शासनाने काढल्याने अनेक पात्र लाभार्थी महिला वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही . त्यामुळे शासनाने दिवाळीनंतर ई केवायसी अनिवार्य करावी व दिवाळीला एकत्रित दोन हफ्त्यांचा लाभ द्यावा तसेच मागील दोन दिवसांपासून अतिवृष्टी व ढगफुटी सारखा पाऊस शहरासह तालुक्यात बरसत आहे .

खरीपातील पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे . त्यामुळे राज्य शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून पंचनामे करण्यात वेळ न घालवता तात्काळ शेतकऱ्यांना एकरी पन्नास हजार रुपयांची नुकसान भरपाई द्या अशी मागणीही उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी केली आहे .

## आरबीआयकडून रेपो दर 'जैसे थे' ठेवल्याचे तज्ज्ञांकडून स्वागत! जाणून घ्या प्रतिक्रिया

आरबीआयने सलग दुसऱ्यांदा रेपो दर 'जैसे थे' ठेवला आहे . चांगल्या दरवाढीसह अर्थव्यवस्था तेजीत असताना मायक्रो इकॉनॉमिक आऊटलूक आधारे आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आपले वित्तीय पतधोरण समितीचा निष्कर्ष आज स काळी १० वाजता आपल्या निवेदनात स्पष्ट केले आहेत . या निमित्ताने रेपो दर ५ .५०% स्थिर ठेवण्याचा निर्णय आरबीआयने जागतिक परिस्थितीवर सावधगिरीची भूमिका घेत आपला 'तटस्थ' ( Neutral ) स्टान्स कायम राखला . त्यामुळे तूर्तास कर्जाचे व्याजदर आण खी स्वस्त होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे . मात्र वाढलेल्या ग्राहकांच्या मागणीचा फटकाही अतिरिक्त तरलतेसह ( Liquidity ) बसू शकतो . त्यामुळे वाढलेल्या अतिरिक्त मागणीमुळे संभाव्य महागाई आटोक्यात राखण्यासाठी आरबीआय अतिरिक्त काही प्रमाणा तील तरलता शोषून घेऊ शकते अथवा नियंत्रित करू शकते .

## बीड जिल्ह्यातील मच्छिमार भोई प्रति कुटुंबांना 50 हजार रूपये नुकसानभरपाई द्यावी – वसंत परसे

➤माजलगाव :प्रतिनिधी
मराठवाड्यात ढगफुटी सारख्या पावसाने थैमान घातलं असून, गोदावरी सिंधफणा वा अन्य छोट्या मोठ्या नद्यांनी पात्र सोडून एक ते दीड किलोमीटर पाण्याने वळण घेऊन जनजीवन विस्कळीत झाले असून, बीड जिल्ह्यातील मच्छिमार भोई समाजाची जाळे,होडी जीवनावश्यक वस्तूंचे प्रचंड नुकसान झाले आहे .

याविषयी अधिक माहिती अशी की, मराठवाड्यातील सर्व नद्यां वर छोट्या मोठ्या तळ्यावर पूर परिस्थिती झालेली आहे त्या गरीब स्थानिक मच्छीमारांचे जाळे,होडी,बोटी संसारोपयोगी वस्तू ,धान्यसह लाखो रुपयाची साहित्य वाहून गेलेले आहेत, मच्छिमार कुटुंबाला ५० हजार रुपये नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी बीड



### "पालकमंत्री अजितदादा मच्छिमार भोई समाजाकडे लक्ष देतील का ?"

● जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ५००० आणि धान्य अशी मदत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केली पण जिल्ह्यातील माजलगाव धरणांसह, अन्य गोदावरी, सिंदफणा, बिंदुसरा व अन्य नद्या काठी आपली छोटी छोटी पालं ठोकून आपले पोटाची खळगी भरण्यासाठी नदी, धरणाकाठी अधिवास करतात परंतु ढगफुटी सदृश्य झालेल्या पावसामुळे व पुरामुळे मच्छिमारांची जाळी, होळी व संसारोपयोगी वस्तू वाहून गेली आहेत, भोई समाजातील प्रत्येक कुटुंबाला पन्नास हजार रुपये भरीव मदत मिळवून देण्यासाठी पालकमंत्री म्हणून काय निर्णय घेतात याकडे जिल्ह्यातील मच्छीमार भोई समाजाचे लक्ष लागले आहे .

जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दि .२७ रोजी पुरपरिस्थितीबाबतच्या दौऱ्यादरम्यान मौजे मंजरथ येथे सामाजिक कार्यकर्ते वसंत परसे व राजेंद्र काका आनंदगांवकर यांनी केली आहे, ग्रामपंचायत मंजरथ येथे मा . मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब मा . गटविकास अधिकारी श्रीमती मुळुक मॅडम, विस्तार अधिकारी ( पं ) श्री . महेंद्र गायकवाड एक्झिक्युटी इंजिनिअर श्री बिडकर सर बांधकाम विभाग : धोंगडे सर, शिंदे सर, भोसले सर ग्रामीण पाणी पुरवठा विभाग : सलगर एस डी, रोडे . एस .के . यांनी पूरपरिस्थिती पाहणी साठी भेट दिली, यावेळी जिल्हातील भोई समाजातील व्यक्तींचे जीवनावश्यक वस्तू होडी जाळे बोटी व नुकसानीचे पंचनामा तात्काळ करून घ्या अशा सूचना दिल्या आहेत .